Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२—ए, फा.प्लॉ.नं. १७८, १७९,
बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807 |
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्वाचे/तातडीचे

क्रमांक रा.मं./परीक्षा.६/६२५१
पुणे.४११ ००४.
दिनांक— १५.११.२०२२

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय**— उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी—मार्च २०२३ परीक्षेबाबत

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, मंडळामार्फत फेब्रुवारी—मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेची संभाव्य वेळापत्रके मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत.

राज्यामध्ये कोविड—१९ चा प्रादुर्भाव कमी झाला असल्यामुळे फेब्रुवारी—मार्च २०२३ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा प्रचलित पध्दतीप्रमाणे घेण्यात येणार असून, याबाबत खालील सूचना आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचे मुख्याध्यापक/प्राचार्य तसेच विद्यार्थी व पालक, सर्व संबंधित घटक यांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

१) सदर परीक्षा १००% अभ्यासक्रमावर आधारित घेण्यात येणार आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी, श्रेणी, अंतर्गत मूल्यमापन इत्यादी सर्व परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार निर्धारित कालावधीतच पार पाडावयाच्या आहेत.
२) **परीक्षार्थ्याने प्रत्यक्ष पेपरच्या वेळेपूर्वी किमान ३० मिनिटे अगोदर आपल्या निर्धारित परीक्षा कक्षामध्ये उपस्थित राहणे अनिवार्य आहे.**
३) प्रचलित पध्दतीनुसार शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना, निर्धारित केलेल्या केंद्रावर परीक्षा घेण्यात येणार आहेत.
४) सदर परीक्षांच्या वेळेमध्ये कोणतीही वाढीव वेळेची सवलत देण्यात येणार नसून वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या वेळेनुसार परीक्षा घेण्यात येणार आहेत.
५) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण—२०१७/(११८/१७)/एस.डी.—६, दि. १६ ऑक्टोबर, २०१८ नुसार पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांना असणाऱ्या सर्व सोयी सवलती देण्यात येतील.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे—०४.

कोविमं/१२ वी परीक्षा/ 2322
दिनांक :- १७/११/२०२२

प्रति,
मुख्याध्यापक व प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये (सातारा, सांगली , कोल्हापूर.)

**विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) फेब्रुवारी-मार्च २०२३ परीक्षेबाबत..**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मंडळामार्फत **फेब्रुवारी-मार्च २०२३** मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांबाबत राज्य मंडळ, पुणे कार्यालयाकडून उपरोक्त प्रमाणे देण्यात आलेल्या सूचनांची नोंद घ्यावी व त्या सूचना विद्यार्थी व पालक तसेच संबंधित घटक यांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.